# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५ वा ❑ बुधवार दि.१२ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# गावगाड्यावरील जगणं सांगणारा साहित्यिक हरपला


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : साहित्य क्षेत्रातून एक दुःखद बातमी समोर आली आहे. मराठी ग्रामीण साहित्याचे दालन समृद्ध करण्यात आपले महत्वाचे योगदान देणारे कथाकार, कादंबरीकार विशेषतः ग्रामीण लेखक प्रा. रा. रं. बोराडे यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

गावातील सुखदुःख मांडणारा साहित्यिक हरपला. वृद्धापकाळाने त्यांचं निधन झालं असून त्यांच्या जाण्याने कलासृष्टीला मोठा धक्काच बसला आहे.

रावसाहेब रंगराव बोराडे (जन्म : २५ डिसेंबर, इ.स. १९४०) हे मराठी भाषेतील कथाकार, कादंबरीकार होते. इयत्ता १०वीत असतानाच त्यांनी लेखनास सुरुवात केली. साधी-सोपी आणि वाचकांच्या हृदयाचा ठाव घेणारी शैली हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य समजले जाते. त्यांच्या कथांचा शेवट धक्कादायक असतो. शेवटच्या धक्क्याने वाचक स्तंभित होतात. त्यांच्या कथांमधून ग्रामीण भागातील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती भेटतात. त्यांनी लिहिलेल्या पाचोळा' या कादंबरीवरून त्यांना पाचोळाकार बोराडे हे नामाभिधान मिळाले आहे या साहित्यातून मराठवाडी बोलीचे अनेक विशेष प्रगट झाले आहेत.

एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेले बोराडे सर म्हणजे महाराष्ट्रातल्या ग्रामीण संस्कृतीची एक साहित्यिक ओळख होती. त्यांच्या साहित्यातील ग्रामीण भागातली बदलती स्थित्यंतर आणि वास्तव चित्रण हे नेहमीच हृदयाला भिडणारे असायचे. अतिशय साधेपणानं राहणाऱ्या बोराडे सरांनी कथाकार-कादंबरीकार, बालसाहित्य लेखक, म्हणून मोठी ओळख मिळवली होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून जबाबदारीचे कामही त्यांनी पार पाडले होते. पाचोळा, आमदार सौभाग्यवती चारापाणी अशा अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. कणसं आणि कडबा, पेरणी, ताळमेळ, मळणी, नातीगोती, खोळंबा या कथासंग्रहासह शिका तुम्ही हो शिका ही



बालकादंबरी, रहाट पाळणा आदी साहित्य बोराडे यांच्या लेखणीतून उतरले.

अस्सल ग्रामीण जीवन जगणारे बोराडे यांची ग्रंथ संपदा फार मोठी आहे. नाटक, साहित्य, विनोद, तत्त्वज्ञान, ब्लॉग साहित्य प्रकार कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा, ब्लॉग सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, ग्रामीण चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ प्रसिद्ध साहित्यकृती पाचोळा आदी साहित्य त्यांचे प्रसिद्ध आहेत. त्यांना विविध पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचे एकूण ५ राज्य पुरस्कार मिळाले. याशिवाय त्यांना फाय फाउंडेशन पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाची सन्मानवृत्ती, यशवंतराव चव्हाण पुरस्कार,अंबाजोगाई, आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार, मराठवाडा सेवा गौरव पुरस्कार, भैरूरतन दमाणी पुरस्कार, जयवंत दळवी पुरस्कार आदी पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला.


१९६३ साली रा.रं. बोराडे हे विनायकराव पाटील यांनी स्थापन केलेल्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वैजापूर येथील महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. १९७१पासून पुढे काही काळ ते त्या कॉलेजचे प्राचार्य होते. आपल्या कर्तृत्वाने वैजापूरसारख्या छोट्या गावाला त्यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक नकाशावर आणले. नंतर ते नामांकित समजल्या जाणाऱ्या औरंगाबादेतील देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य बनले. श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे प्राचार्य राहिलेले आहेत. २००० साली त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली.त्याच वर्षी राज्य सरकारने बोराडे यांची महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत त्यांनी सरकारी गोदामांत सडत पडलेली पुस्तके ग्रंथालयांना वितरित करविली. खेड्यापाड्यांतील ग्रंथालयांना या योजनेचा फायदा झाला. दुर्लक्षित वाचकांनाही पुस्तके मिळाली. ज्या ठिकाणी ते गेले, तेथे त्यांनी आपल्या कामाचा अमीट ठसा उमटवला.११ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता वृद्धापकाळाने एमजीएम रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे निधन झालं. ज्येष्ठ साहित्यिक रा. रं.बोराडे यांना नुकताच महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग अंतर्गत २०२४ करिता विं.दा. करंदीकर जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.अशा महान साहित्यिकास विनम्र अभिवादन !!

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

## ग्रामीण वेदनेचा कथाकार हारपला. !!

रा.रं.बोराडे सरांचा सहवास..मार्गदर्शन मला विशेष मिळाले.एक आठवण मला नमुद करावीशी वाटते ती म्हणजे...रा.रं बोराडे सरांचे शालेय शिक्षण बार्शीच्या सुलाखे हायस्कूल मधे झाले नी कॉलेजचे शिक्षण सोलापूरच्या दयानंद कॉलेज मध्ये झाले.माझेही शालेय शिक्षण बार्शीच्या सुलाखे हायस्कूल मधे व कॉलेजचे शिक्षण हे सोलापूरच्या दयानंद कॉलेज मध्ये झालेले आहे.त्यामुळे बोराडे सरांनी बोलताना आमच्या सुलाखे हायस्कूल व दयानंद कॉलेज मधील अनेक जुन्या आठवणींना उजाळा मिळत असे... ग्रामीण कथा लिहिताना त्यांची वेदना ही नेमक्या शब्दांतून कशी उतरली पाहिजे हे बोराडे सर आम्हाला नेहमीच सांगत असतं.मी नवीन ग्रामीण कथा लिहिली की त्यांना त्यांच्या निवासस्थानी जावून दाखवून मार्गदर्शन घेऊन येत असे... आज इतक्या उंचीचा अलौकिक साहित्यिक पुन्हा होणार नाही हे बाकी खरं.

साहित्य क्षेत्रातील
आमचा आधार
कायमचा
दूरावला...
आकाशाची उंची
असणाऱ्या ग्रामीण
साहित्यीकाला
आम्हां सर्वांचा
मानाचा मुजरा...
आमची भावपूर्ण
आदरांजली ...



**सुधीर कोर्टीकर...**
छत्रपती संभाजी नगर.

## लक्षवेधी छायाचित्र....



The King, Masai Mara, Kenya

(छाया - संजय दारमवार, मुंबई)

## साहित्य संमेलन अभिजात गीताचे लोकार्पण

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नागपूर** - दिल्ली येथे २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत होऊ घातेलल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अभिजात गिताचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी कौतुक केले. 'आम्ही असू अभिजात' असे या गीताचे शब्द आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे संमेलन देशाच्या राजधानीत ७० वर्षांनी होत आहे. या संमेलनाचे यजमानपद पुण्यातील सरहद संस्था भूषवित आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर संमेलनाध्यक्ष आहेत. संमेलनाच्या निमित्ताने डॉ. अमोल देवळेकर यांनी लिहिलेले 'आम्ही असू अभिजात' हे संमेलन गीत संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले आहे. या संमेलन गिताचे लोकार्पण ना. श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. नागपूर येथे झालेल्या या छोटेखानी



सोहळ्याला संगीतकार आनंदी विकास, विकास देशमुख, अनिल मुळजकर, आदित्य विकास, योगेश कदम यांची उपस्थिती होती.

**हरिहरन, शंकर महादेवन यांचे स्वर** - संमेलन गिताला सुप्रसिद्ध गायक-संगीतकार शंकर महादेवन आणि हरिहरन यांच्यासह मंगेश बोरगावकर, सागर जाधव, शमिमा अख्तार यांचे स्वर लाभले आहेत. ना. श्री. गडकरी यांनी संमेलन गिताचे कौतुक केले. तसेच शंकर महादेवन व हरिहरन यांच्यासारख्या दिग्गज गायकांच्या स्वरांमुळे खऱ्या अर्थाने अभिजात निर्मिती झाली असल्याचे गौरवोद्गारही काढले.

या गीताची लिंक देत आहोत यावर आपण या सुमधुर गाण्याचा आस्वाद घेऊ शकता.

https://youtu.be/zD3guX-WiWw?feature=shared

## दिल्ली साहित्य संमेलनाची कार्यक्रम पत्रिका जाहीर; २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान भरणार साहित्यिकांचा मेळा!

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. संमेलनाच्या कार्यक्रम पत्रिकेची घोषणा अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने केली आहे. साहित्यप्रेमींसाठी या संमेलनात विविध महत्त्वाच्या विषयांवर परिसंवाद आणि सादरीकरणे होणार आहेत.

**संमेलनाचा कार्यक्रम :**

संमेलनाच्या पहिल्या दिवशी, २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:३० वाजता ग्रंथदिंडीने संमेलनाला प्रारंभ होईल. दुपारी ४ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. सायंकाळी ६:३० वाजता




उद्घाटन समारंभाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. रवींद्र शोभणे आणि डॉ. ताराबाई भवाळकर यांच्या भाषणांचा समावेश असेल.

**२२ फेब्रुवारीच्या कार्यक्रमांची माहिती :**

दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता 'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादात मराठी समाज आणि भाषा यांचे भविष्य मांडले जाईल. दुपारी १२:३० वाजता 'मराठीचा अमराठी संसार' या विषयावर चर्चासत्र होईल.

दुपारी २:३० ते ४ वाजता 'भूपाळी ते भैरवी' या लोकसाहित्यावरील कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. संध्याकाळी ७ वाजता 'मधुरव' हा मराठी भाषेचा इतिहास सांगणारा कार्यक्रम मधुरा वेलणकर सादर करतील.

२३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता 'अनुवाद-मराठीतून इतर भाषेत किंवा इतर भाषेतून मराठीत' या विषयावर परिसंवाद होईल. दुपारी १२ वाजता 'सामाजिक कार्य आणि मराठी साहित्य' यावर चर्चा होईल. संमेलनाच्या समारोपाचा कार्यक्रम दुपारी ४:३० वाजता होईल.




– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## अंतर्मन हेच प्रेमाचं प्रतिबिंब असावं

ज्योतिर्मय साहित्य

आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातले सार कशांत आहे, हेही कळू शकते. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.

प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतेच असे नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलेही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो. प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असते असे नाही. आपले अंतर्मन हे खरे तर प्रेमाचे प्रतिबिंब असावे, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचे खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असते. प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणे जरुरीचे असते. जीवनाचे खरे सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेले असते. प्रेमासाठी तन अथवा धन नाही, तर मन महत्वाचे असते, ह्याची जाणीव सतत ठेवणे जरुरीचे असते.

## खरोखरच आपण सुखी आहोत का?




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

आपल्याकडे तर सर्व संतांनी जीवनातील सुख आणि दुःख याची जाणीव आपल्या अभंगातून मानवाला फार पूर्वीच करून दिली आहे. समर्थ रामदास म्हणतात, जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारे मना तूच शोधूनि पाहे. जगात सुखी आहे अशी व्यक्ती आढळणे कठीणच. सामान्य माणूसपासून ते अगदी उद्योगपती असलेल्या टाटा, बिर्ला, अंबानी पर्यंत प्रत्येक जण काहीना काही तरी कमी आहे म्हणून दुःखी असतो. माणूस सतत सुखाच्या शोधात धावत असतो. पण सुख हे मृगजळ आहे. ते सतत हुलकावणी देत राहते.

आपण लहान असतो तेव्हा वाटतं की मी मोठा झाल्यावर सुखी होईन. मोठा झालो की चांगली नोकरी मिळाली आणि भरपूर पैसा मिळाला की सुखी होईन. मग सुखाच्याच शोधात असताना लग्न होतं, मुलंबाळं ही होतात. पण तरी सुख सुख असं जे काय म्हणतात, ते काही हाती लागत नाही.


सुख बाह्य परिस्थितीवर अवलंबून असते तर समाधान ही मनाची अवस्था असते. ती तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत आनंदी ठेवते. ग. दि. माडगूळकर आपल्या एका गीतात म्हणतात, पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी, देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी. मला जास्त नको. पोटापुरते मिळाले म्हणजे पुरे असे मागणे देवाकडे मागणारा माणूस खरोखरच सुखी असतो.

आज आपण भौतिक प्रगती खूप केली आहे.



हाताशी विविध अत्याधुनिक गोष्टी उपलब्ध आहेत. विज्ञानाच्या प्रगतीतून हाती लागलेली अनेक यंत्र मानवाची सेवा करत आहेत. माणूस अगदी चंद्रावर, मंगळावर जाऊन पोहोचला आहे. पण हे सगळे असले तरी सुख मात्र दूर दूर पळते आहे. त्याला कारण म्हणजे सुखाच्या आपल्या असलेल्या अवास्तव कल्पना. खरं सुख त्यात नाही याची जाणीव असूनही आपण त्यामागे व्यर्थ धावत राहतो. उंदीर एकदा एखाद्या सापळ्यात अडकला आणि त्यातून निसटला की तो पुन्हा म्हणून तसल्या सापळ्यात अडकत नाही. आपण मात्र सुखासाठीच्या अनेक सापळ्यात पुन्हा पुन्हा अडकत राहतो. हे सापळेही आपणच तयार केलेले असतात.

(क्रमशः)




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## नरदेहस्तवन (समास दहावा)

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

श्रीपाद श्रीवल्लभ यांनी कुरवपूरला राहून लोकांना सन्मार्गाचा उपदेश केला. लोकांना दुःखमुक्त केले. समाजातील विकृती नाहीशी व्हावी, मुस्लीम आक्रमणाने गांजलेली आणि विस्कळीत झालेली समाजाची घडी नीट बसावी, धर्माची आणि संस्कृतीची पुन:स्थापना व्हावी, हा त्यांच्या अवतारस्थापनेचा उद्देश होता. त्या वेळी समाज अत्यंत दुर्बल झाला होता. म्हणूनच श्रीदत्तात्रेयांनी श्रीपाद श्रीवल्लभ अवतार धारण करून खूप मोठे कार्य केले. श्रीपाद म्हणजे श्री पादेयस्य ज्याच्या चरणाजवळ श्री म्हणजे लक्ष्मी आहे असा तो. लक्ष्मीयुक्त परमात्मा म्हणजे श्रीपाद. श्री लक्ष्मीदेवी ज्याच्याजवळ आहे आणि म्हणून सर्वांना वल्लभ आहे, म्हणजे प्रिय आहे असा सुंदर अर्थ त्यांच्या नावाचा आहे.

त्यांचा आयुष्यकाल केवळ तीस वर्षांचा होता. पण या अल्प आयुष्यात त्यांनी प्रचंड कार्य केले. आंध्रप्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातील पीठापूर हे त्यांचे जन्मठिकाण. तेथून ते कुरवपूर या ठिकाणी गेले. श्रीपाद श्रीवल्लभांनी त्यांच्या अवतारकाळात अनेक अगम्य लीला केल्या. या अवतारानंतरच श्रीदत्त संप्रदायाची भारतामध्ये अतिशय जोमाने वाढ झाली. श्रीपाद श्रीवल्लभ यांना मानणारा मोठा संप्रदाय आंध्रप्रदेशाबरोबरच कर्नाटक आणि महाराष्ट्र तसेच संपूर्ण भारतात पसरला आहे. यामध्ये श्रीपाद श्रीवल्लभ आणि दत्तात्रेय हेच आराध्य दैवत आहे. 'श्रीपादराजं शरणं प्रपद्ये' हा त्यांचा प्रमुख इष्ट मंत्र आहे. स्वामींचा सहवास, त्यांचे दर्शन हवेहवेसे वाटत असतानाच शके १३५० मध्ये गुरुद्वादशीच्या दिवशी त्यांनी आपला अवतार संपवला आणि ते निजधामी गेले. असे असले तरी आजही ते सूक्ष्मदेहाने कार्यरत आहेत आणि आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करीत असतात. कलियुगात त्यांचे नामस्मरण शीघ्र फलदायी आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## अकर्तेपणाने नाम घ्यावे

ज्योतिर्मय साहित्य

काही न करणे, आपण काही करीत आहो किंवा आपल्याला करावयाचे आहे असे न वाटणे, हाच परमार्थ. पण स्वस्थ बसायला लावणे ही तुरूंगात मोठी शिक्षा समजतात. देहाने, मनाने, एकसारखी चळवळ करण्याची आपल्याला सवय लागली आहे. देहाला स्वस्थ बसायला लावणे कठीण, मनाला स्वस्थ बसायला लावणे त्यापेक्षा कठीण, आणि देह कर्म करीत असताना मनाला स्वस्थ बसविणे हे अत्यंत कठीण. मनाला खरे म्हटले तर स्वास्थ्य हवे. पण ते मिळविण्याकरता साधन करणे, म्हणजे प्रयत्न करणे, जरूर आहे. मनाचे स्वास्थ्य बिघडायला कारणे काय ती पाहू. पहिले, आपल्या इच्छेविरूद्ध गोष्ट होणे; दुसरे, आपल्या बऱ्यावाईट कर्मांची आठवण होणे; आणि तिसरे, उद्याची काळजी करणे. जो तो आपल्या इच्छेप्रमाणे व्हावे असे म्हणणार; सर्वजण तुमच्याच इच्छेप्रमाणे कसे चालतील ? तुमच्या इच्छेविरूद्ध गोष्टी होणारच. तेव्हा स्वास्थ्य बिघडू न द्यायला, आपली इच्छाच नाहीशी करावी. कोणतीही वस्तू मिळावी ही बुद्धी नाही ठेवू. हाव सोडावी. लोकांची आस सोडावी. अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून यश आले नाही म्हणजे दुःख होते, स्वास्थ्य बिघडते; मी केलेच नाही म्हटले म्हणजे कुठले दुःख ? प्रयत्न करून जे काही होते ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. प्रत्येक गोष्ट रामाने केली म्हणणे म्हणजे भगवंताच्या अखंड अनुसंधानात राहणे. हे साधण्यासाठी अखंड नामस्मरण करावे. जे झाले, जे होते आहे, आणि जे होईल, ते भगवंताचेच आपल्या हिताकरिता करणे आहे. आपण कर्ते नाही, असे मानणे, याला अखंड भगवन्नामस्मरण पाहिजे. सारांश, जे जे काही झाले, ते ते भगवंतानेच आपल्या हिताकरिता केले. उद्याची काळजी भगवंतालाच आहे. त्याला काय योग्य वाटेल ते तो करील. म्हणून, झाल्याची म्हणजे कालची आठवण करू नये, होणाऱ्याची म्हणजे उद्याची काळजी करू नये, आणि चालू क्षण वाया जाऊ देऊ नये, नामस्मरणात राहावे. सगळया प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे.

आहे त्या परिस्थितीत समाधान नसणे हा जो देहबुद्धीचा स्वभाव तो आपण सगळीकडे लावतो. सर्व गोष्टींचे ज्ञान होत नाही तोपर्यंत आपण काही करणार नाही, असे आपण म्हणतो; सर्व गोष्टींचे ज्ञान मरेपर्यंत आपल्याला होत नाही, आणि आपण काही करीत नाही ! देहबुद्धी आपल्याला भगवंताचा विसर पाडते. या देहबुद्धीवर आपण नामाच्या मंत्राचे पाणी शिंपडू या म्हणजे तिची वाढ होणार नाही.

मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात.

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## स्वच्छतादूत: झोप

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

दुसरी पायरी ''गाढ झोप'' या अवस्थेत गाढ झोप लागते. आजूबाजूचे भान नसते. शरीराची गती मंदावलेली असते. एक लयबध्द मेंदू लहर चालू असते. या वेळी मेंदू विविध स्मृती, अनुभव यावर काम करीत असतो. आवश्यक ते कायमच्या स्मृतीत साठवून ठेवण्याचे काम मेंदू करतो. या काळात मेंदूतून ''डेल्टा वेव्हस'' बाहेर पडत असतात.

तिसरी पायरी म्हणजे ''अत्यंत गाढ झोप'' बरेचदा या अवस्थेतील व्यक्ती पटकन उठू शकत नाहीत. या वेळी शरीराची दुरुस्ती, पूनर्साठवण व पुनर्रचना करणे या विषयी शरीराला सूचना दिल्या जातात. ही अवस्था झोपल्या नंतर साधारण ९० मिनिटांनी सुरु होते. ही अवस्था गाढ झोपेची असली तरी बुबुळे हलणे, ह्रदयाचे ठोके वाढणे, कुस बदलणे अशा आपल्याला न कळणाऱ्या हालचाली होतात. या काळात अनेक अनुभव आपल्या कायमच्या आठवणीत रूपांतरित केले जातात. झोपेच्या दुसऱ्या व तिसऱ्या पायरीत शरीराची झीज भरून काढणे, हाडे व स्नायू बळकट करणे, रोग प्रतिकार शक्ती वाढवणे अशी कामे केली जातात.

या तीन पायऱ्या एकदा पूर्ण झाल्या की पुन्हा दुसरी व तिसरी पायरी याची अवर्तने होतात. ही वेळ प्रत्येक व्यक्ती परत्वे वेगळी असते. या क्रिया फक्त रात्रीच्या झोपेतच पूर्ण होतात. म्हणून रात्रीची झोप महत्वाची असते. रात्री उशिरापर्यंत जागून दिवसभर झोपणे याचा उपयोग होत नाही. म्हणून दिवसा कितीही वेळ झोपले तरी उत्साही वाटत नाही. म्हणून आज पासून रात्री लवकर शांत व गाढ झोपेची सवय लावून घेऊ या. बरेचदा ही तक्रार असते शांत झोप लागत नाही. त्या साठी काय करु शकतो, हे पुढच्या लेखात पाहू.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**अम्भोजिनीवनविहारविलासमेव**
**हंसस्य हन्ति नितरां कुपितो विधाता।**
**न त्वस्य दुग्धजलभेदविधौ प्रसिद्धां**
**वैदग्ध्यकीर्तिमपहर्तुमसौ समर्थः।।**

अर्थ – सृष्टीचे रचयिता विधाता हंसावर अतिशय रागावून त्याचे कमळवनांतरी विहाराचे सुख तेवढे नष्ट करू शकतात. पण पाणी आणि दूध वेगळे करण्याचे त्याचे विख्यात कौशल्य ते नष्ट करू शकत नाहीत. ही अन्योक्ति आहे. सत्ताधारी लोक विद्वानांच्या शरीराला प्रतिबद्ध करू शकतात. पण त्यांचे ज्ञान आणि विचार करण्याची क्षमता ते नष्ट करू शकत नाहीत. ज्याचेकडे हंसाप्रमाणे नीरक्षीरविवेक म्हणजेच सदसद्विवेक असतो, तो खरा विद्वान होय. हितकारक काय आणि अहितकारक काय, याचा विश्लेषणात्मक विचार विद्वज्जन करीत असतात. असा विचार जर कधी राज्यकर्त्यांच्या विरोधी असेल, तर राज्यकर्ते अशा विद्वानांना दंडित करतात. उदा. सॉक्रेटिस. ग्रीक राज्यकर्ते सॉक्रेटिसच्या देहास दंडित करू शकले; पण त्याचा विचार संपवू शकले नाहीत. भर्तृहरी देखील येथे हेच सांगत आहेत की, विद्वानाच्या शरीरास दंड किंवा शिक्षा करता येईल, पण त्याचा विचार संपविता येणार नाही. आपला आशय स्पष्ट करण्यासाठी कवीने येथे हंसाच्या नीरक्षीरविवेकाचा दाखला दिला आहे.

## ।। श्री स्वामी समर्थ ।।



ज्योतिर्मय साहित्य

स्वामी म्हणतात – कुत्र्याचे सारे गुण माणसांनी घेतले; पण इमानदारी नाही घेतली...! स्त्रीच्या गर्भातून जन्म घेवून त्यानेच पाटी लिहिली, ''स्त्रियांना येथे प्रवेश नाही''. कमाल आहे माणसा तुझी...! भरलेलं घर आणि सुंदर मन हे फक्त समाधानी व्यक्तींचेच असते कारण तो व्यक्ती स्वतःकडे जे काही आहे त्यात खुश असतो आणि इतरांचे वाईट व्हावे हा विचार तो कधीच करत नाही..!

स्वामी म्हणतात – एखादा व्यक्ती एखाद्या कल्पनेसाठी मरतो, परंतु ती कल्पना, त्याच्या मृत्यूनंतर, एक हजार जीवन ती देईल. एखाद्याची सर्वात मोठी चूक म्हणजे त्याचे वास्तविक स्वरुप ओळखणे नाही, आणि केवळ आत्मज्ञान आत्मसात केल्याने ते सुधारले जाऊ शकते. ज्या दिवशी तुम्ही हसला नाहीत तो दिवस फुकट गेला असे समझा.




## केमिकलचा वापर न करता पांढरे केस करा काळे

ज्योतिर्मय साहित्य

आजकाल धूळ, प्रदूषण, ताण-तणाव किंवा अनुवंशिक आजारांमुळे कमी वयातच केस पांढरे होण्याचे प्रमाण वाढले आहे. पांढरे केस लपवण्यासाठी अनेक जण हेअर कलर, हेअर डायचा वापर करतात. मात्र त्यामध्ये असणाऱ्या केमिकलमुळे केस कमकुवत बनतात, गळतात. काही जणांना त्वचेची ॲलर्जी होते.

अकाली पांढऱ्या केसांना काही घरगुती उपाय करून केस काळे करता येतात.



१) खोबरेल तेल – खोबरेल तेलात लिंबाचा रस घालून हलक्या हाताने मालिश करा. त्यामुळे केस काळे आणि चमकदार होतील. आवळ्याचे बारीक तुकडे गरम खोबरेल तेलात मिक्स करुन केसांना लावा.

२) आवळा – आवळ्याला मेंहदीमध्ये सुद्धा मिसळून लावा. नियमित आवळा खाण्याने सुद्धा केस काळे होतात.

३) ब्लॅक टी – ब्लॅक टीच्या अर्काने केस धुवा. दोन दिवसांतून एकदा हे केल्याने फरक दिसून येईल.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

४) कोरफड – कोरफड जेलमध्ये लिंबूचा रस टाकून पेस्ट बनवून केसांना आणि मुळांना लावा. हे नियमित लावल्याने पांढरे केस काळे होतील.

५) पेरुची पाने – पेरुची पाने वाटून त्याची पेस्ट करा. ही पेस्ट केसांना लावा.

६) कडीपत्ता – कडीपत्ता खोबरेल तेलात घालून रोज त्या तेलाने नियमितपणे केसांना मसाज करा. रात्रभर ठेवा आणि दुसऱ्या दिवशी शॅम्पूने केस धुवा. मोहरीच्या तेलामध्ये कडीपत्ता उकळून घ्या. हे तेल नियमित रात्री झोपताना केसांना लावा.

# कुतूहलातून विविध विषयांवरील साहित्याची निर्मिती; राज्यस्तरीय साहित्य संमेलनात डॉ. अच्युत गोडबोले यांचे प्रतिपादन

## मंत्री उदय सामंत यांनी दृकश्राव्य माध्यमाव्दारे संमेलनाला शुभेच्छा

ज्योतिर्मय साहित्य

**सगरोळी (नांदेड )** – विश्व, मनुष्य व निसर्ग निर्मितीचे लहानपणापासूनच मला प्रचंड कुतूहल होते. कुतूहलापोटी वाचनाची आवड निर्माण झाली. पुढे लेखणीतून प्रगट होत गेलो व माझ्या हातून विविध विषयांवर ५६ पुस्तकांची निर्मिती झाली असल्याचे जेष्ठ साहित्यिक डॉ. अच्युत गोडबोले यांनी सांगितले. सगरोळी (ता. बिलोली) येथे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर देगलूर-बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापुरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, माजी आमदार गंगाधर पटणे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी साहित्यिक देविदास फुलारी आदींची उपस्थिती होती. उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दृकश्राव्य माध्यमाव्दारे या संमेलनाला शुभेच्छा दिल्या.

रविवार (ता.९) रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व येथील संस्कृति संवर्धन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते.

'मुसाफिर' या पुस्तकाने अनेकांच्या आत्महत्या रोखल्या, बोर्डरूम हे पुस्तक वाचून अनेकांनी उद्योग उभारले. समाजास याचा लाभ होत असल्याने समाधान वाटते. उद्याचे जग हे तंत्रज्ञानावर आधारित असून हे सर्वांना समजावे म्हणून मराठीतून पुस्तके लिहिली. तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत राहावे. प्रचंड वाचन, गाणी, चर्चा यासह त्यातील मुख्य शिलेदार, माणसे, त्याची थेरी, मूलतत्त्वे याचा अभ्यास केला. लोकांचा विश्वास व माझाही आत्मविश्वास वाढला, माझ्यामुळे सहलेखक तयार झाले. येथील संस्थेचे काम पाहून प्रभावित झालो असल्याचे ते म्हणाले.

माझ्या मतदारसंघात हा कार्यक्रम होत असल्याने अभिमानास्पद आहे. येथे अनेक कार्यक्रमातून नागरिकांची जडणघडण होत असल्याचे आमदार जितेश अन्तापुरकर म्हणाले.


सगरोळी येथील कर्मयोग्याच्या भूमीत हे संमेलन व्हावे अशी मनापासून इच्छा होती. यापुढे सगरोळी येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरावे अशी इच्छा मार्तंड कुळकर्णी यांनी





व्यक्त केली. प्रमोद देशमुख यांनी सर्व मान्यवर व सारस्वतांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. परिसरास कर्मयोगी बाबासाहेब देशमुख साहित्य नगरी तर सभा मंडपास मराठवाड्याचे भूमिपुत्र कविवर्य दे.ल. महाजन यांचे नाव दिले होते. यावेळी साहित्यिक व श्रोते मोठ्या संखेने उपस्थित होते.

संमेलनाच्या उद्घाटनासाठी मराठी भाषामंत्री उदय सामंत उपस्थित राहणार होते, परंतु त्यांनी आभासी पद्धतीने श्रोत्यांशी संवाद साधला. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यशासन कटिबद्ध असून सर्वतोपरी मदत केली जाईल अशी ग्वाही देऊन संमेलनास शुभेच्छा दिल्या.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

रवींद्रनाथांना अपेक्षित असलेला निसर्ग म्हणजे केवळ शांतिनिकेतनाच्या भोवती असलेली वृक्षवेलींनी बहरलेला परिसर नव्हता. तर त्या निसर्गाची अनुभूती शिक्षण घेता घेता विद्यार्थ्यांना यावी असं त्यांना वाटत होतं. वृक्षांच्या शीतल छायेत बसणं, पक्ष्यांची कुजबुज ऐकणं, नदीच्या पाण्यात डुंबणं, त्या पाण्याचा सर्वांगाला स्पर्श करून घेऊन त्या जीवनदायिनी नदीशी आपलं मानसिक नातं जोडणं या सगळ्या गोष्टी त्यांना अपेक्षित होत्या. नाहीतर निसर्गरम्य वातावरणात असलेल्या शाळा त्या काळातही होत्याच. सिमला, मसुरी, डेहराडून आदी ठिकाणी अशा शाळा होत्या. आजही अशा अनेक शाळा आहेतच. पण केवळ शाळेभोवती निसर्ग असणं आणि त्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्याची अनुभूती घेता घेता शिक्षण देणं वेगळं. म्हणून रवींद्रनाथांची शाळा या शाळांपेक्षा आगळीवेगळी असणार होती.

पण इतके सुंदर आणि उदात्त विचार असणाऱ्या रवींद्रनाथांकडे आणि त्यांच्या शाळेकडे पाहण्याचा तत्कालीन समाजाचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित होता. हा माणूस आमच्या मुलामुलींना नाचगाणी शिकवणार, चित्रं काढायला शिकवणार, निसर्गात रिकामटेकडी भ्रमंती करायला लावणार, कविकल्पनेत रमणार आणि आमच्या मुलांना बिघडवणार असे लोकांना वाटत होतं. त्यामुळे त्यांच्या शाळेकडे लोक फिरकायला तयार नव्हते. इंग्रजी भाषा लिहिता, वाचता, बोलता येणं म्हणजेच सर्वस्व असं समजणारा समाज मुलांना त्यांच्या शाळेत घालायला तयार नव्हता.

एकीकडे स्थानिक बंगाली लोकांचा असा दृष्टिकोन होता तर दुसरीकडे त्यांच्याकडे पाहण्याचा ब्रिटिशांचा दृष्टिकोनही संशयास्पद होता. आपल्या भाषेत मुलांना शिक्षण देऊ इच्छिणारा, इंग्रजी भाषेचे मुलांच्या मानेवरील जोखड फेकून देणारा हा माणूस त्यांना ब्रिटिशविरोधी वाटत होता. स्वधर्म, स्वभाषा आणि आपली संस्कृती यांचं शिक्षण देणं म्हणजे राजद्रोह असा समज ब्रिटिश सरकारचा झाला होता. लोकमान्य टिळकांना रँडच्या खुनखटल्यात गोवल्याने त्यांनी इंग्रज सरकारवर कडाडून टीका केली होती. तर टिळकांना हा खटला लढताना आर्थिक मदत व्हावी म्हणून त्यांनी निधीही जमवला होता. या सगळ्या कारणांमुळे ब्रिटिश सरकार रवींद्रनाथांकडे आणि त्यांच्या या शांतीनिकेतनाच्या प्रयोगाकडे संशयाने पाहत होते.

**(क्रमशः)**

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी विशेष रेल्वे, कसा आहे मार्ग आणि वेळ ?

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – दिल्ली यथे आयोजित करण्यात आलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पुणे ते दिल्ली आणि दिल्ली ते पुणे अशी रेल्वे गाडी धावणार आहे, अशी माहिती मध्ये रेल्वे पुणे विभागाकडून पत्रकाद्वारे देण्यात आली.

यंदाच्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे यजमानपद राजधानी दिल्लीकरांकडे आहे. त्यामुळे विशेष रेल्वे सोडण्यात यावी, अशी मागणी साहित्यिकांकडून करण्यात येत होती. दरम्यान, याबाबत केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमत्री मुरलीधर मोहोळ यांनी विशेष रेल्वे सोडण्यात यावी, अशी विनंती रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. त्यानुसार बुधवारी (१९ फेब्रुवारी) पुणे ते दिल्ली सफदरजंग ही रेल्वे दुपारी ३ वाजून १५ मिनीटांनी सुटेल. तर रविवारी (२३ फेब्रुवारी) दिल्ली सफदरजंग स्थानकावरून रात्री १०.३० वाजता पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे.

या गाडीला जळगाव आणि ग्वालियर असे दोनच थांबे असणार आहेत, तर १६ शयनकक्ष आणि दोन द्वियीय श्रेणी, असे डब्यांचे नियोजन करण्यात आले असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.

# साहित्य संमेलनाला राज्य सरकारचे 'अनपेक्षित' बळ, आवश्यक सुविधांसाठी खास 'दूत' नेमल्याने आयोजकही अवाक

ज्योतिर्मय साहित्य

**नागपूर** – ऐरवी साहित्य संमेलनाला दोन कोटींचा निधी देवून स्वत:ला संमेलनापासून नामनिराळे ठेवणारे राज्य सरकार यंदा मात्र दिल्लीत होणाऱ्या संमेलनासाठी फारच 'उदार' झाल्याचे चित्र आहे. या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी सरकारने खास 'दूत' नेमला असून वाढीव निधीसह आवश्यक सर्व सुविधा पुरवण्याची जबाबदारी या दुताला सोपवण्यात आल्याचे कळते. विशेष म्हणजे, सरकारच्या या 'अनपेक्षित' पाठबळाने आयोजक व साहित्य महामंडळही अवाक झाले असून पंतप्रधान मोदी संमेलनाचे उदघाटन करणार असल्याने सरकारने हा विषय प्रतिष्ठेचा केल्याची चर्चा आहे.




यंदाचे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राष्ट्रीय राजधानी दिल्लीत २१,२२, २३ फेब्रुवारी रोजी होत आहे. या संमेलनासाठी राज्य सरकारने 'प्रथेप्रमाणे' दोन कोटींचा निधी साहित्य महामंडळाला सोपवला. परंतु, संमेलन दिल्लीत असल्याने व खर्चाचा आकडा सातत्याने वाढत असल्याने अधिकचा निधी मिळावा, यासाठी महामंडळाने ७ जानेवारी रोजी सरकारला विनंतीपत्र दिले होते. परंतु, महिनाभर त्यावर विचारच झाला नाही. त्यामुळे आयोजकांनी आवश्यक निधी उभा करण्यासाठी पर्यायांचा विचार सुरू केला. काही निधी उभाही झाला. पण, खर्चाच्या तुलनेत तो फारच तोकडा होता. दरम्यान, ही बाब सरकारपर्यंत पोहोचली व पंतप्रधान ज्या संमेलनाला येत असल्याने तिथे पैशांअभावी कुठलाही 'कमीपणा' जाणवू नये यासाठी सरकार अचानक सक्रिय झाल्याची माहिती आहे. केवळ निधीच नाही तर संमेलनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक त्या सर्व बाबींवर योग्य लक्ष देता यावे आणि संवादाअभावी ऐनवेळी कुठलीही गडबड होऊ नये, यासाठी राज्य सरकारने आयोजक व सरकारमधील दुवा म्हणून मुख्यमंत्री कार्यालयातील कामाचा मोठा अनुभव असलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला 'खास दूत' नेमल्याचे कळते.

दिल्लीतील संमेलनात काही कमी पडू नये यासाठी, शिंदे सेनेचे नेते व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याही दिल्ली वाऱ्या वाढल्या आहेत. संमेलनाच्या निमित्ताने मराठीशी संबधित दिल्लीतील प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी त्यांनी १३ फेब्रुवारी हा पूर्ण दिवस दिल्लीत घालवण्याचा निर्णय घेतल्याचे कळते. यात 'जेएनयू'तील मराठी अध्यासनाचा तिढा सोडवण्याचा प्रयत्नही होऊ शकतो. संमेलनासाठी कोण जास्त मदत करतो, अशी एक 'अघोषित शर्यत' एकाच सरकारमधील दोन पक्षांत सुरू असल्याचे यावरून स्पष्ट होत असून या अघोषित शर्यतीमुळे आयोजकांच्या अडचणी आपोआपच दूर होत असल्याचे चित्र आहे.

# सुशिक्षित बेरोजगारांचे भीषण वास्तव मांडणारी वास्तवदर्शी कादंबरी '' कीड''

ज्योतिर्मय साहित्य

कादंबरी हा तसा पाहिला तर इंग्रजी साहित्यातील प्रकार.जगप्रसिद्ध कादंबरीकार शेक्सपिअर यांनी हा प्रकार इंग्रजी साहित्यात आणला आणि तो प्रचंड यशस्वी ठरला. त्यांच्या ''हॅम्लेट'' ''ऑथेल्लो'' आणि ''मॅकबेथ'' या कादंबऱ्या त्या काळात जागतिक स्तरावर खूप मोठ्या प्रमाणात गाजल्या. त्यानंतर मात्र जागतिकीकरणाच्या ओघात कादंबरी हा प्रकार फक्त इंग्रजीपुरता मर्यादित न राहता तो जगातील इतर भाषांतील लेखकांनी स्वीकारला आणि त्याचबरोबर जगातील इतर भाषांमधून देखील कादंबरी लेखन तेवढ्याचं जोमाने सुरू झाले.


मराठी भाषेचा विचार केला तर मराठीमध्ये ''यमुना पर्यटन'' ही पहिली कादंबरी आली.त्यानंतर ययाती,पानिपत,स्वामी,छावा,बनगरवाडी,यासारख्या विविधांगी विषयांवरील कादंबऱ्या प्रचंड गाजल्या पण नंतर मात्र शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण माने,किशोर शांताबाई काळे,अशोक पवार,उद्धव शेळके,सदानंद देशमुख यासारख्या लेखकांनी मराठी साहित्याला आपल्या वास्तववादी लेखनातून समृद्ध केले.''उचल्या'' ''अक्करमाशी'' कोल्हाट्याचं पोर'' ''बलुतं'' ''धग'' ''बारोमास यासारख्या कादंबऱ्यांनी समाजमन ढवळून काढलं.समाजाला वास्तवाची जाणीव करून दिली.वरील सर्व कादंबऱ्या या सामाजिक प्रवाहाच्या विरुद्ध असल्या तरी त्यामधून त्या त्या लेखकांनी सामाजिक वास्तव अतिशय प्रखरतेने मांडल्यामुळे सामान्य माणसांना त्या कादंबऱ्या कुठेतरी आपल्याश्या वाटतात.

कादंबरीच्या प्रांतात वैदर्भीय लेखकांनी सुद्धा भक्कमपणे लेखन करून अनेक सशक्त कादंबऱ्या या साहित्य विश्वाला दिलेल्या आहेत.उद्धव शेळकेंची धग असो की सदानंद देशमुख यांची बारोमास असो की,रमेश इंगळे उत्रादकर यांची ''निशाणी डावा अंगठा'' या सर्व कादंबऱ्या समाजातील भीषण वास्तव मांडणाऱ्या आहेत.वैदर्भीय लेखकांनी कायमचं आपल्या लेखणीतून सामाजिक वास्तव प्रखरतेने मांडण्याचे काम केलेले आहे.अगदी अलीकडची

संजय महल्लेंची ''तिचं काय चुकलं'' या सर्व कादंबऱ्यांतून वेगवेगळे सामाजिक प्रश्न लेखकांनी समाजापुढे प्रकर्षाने मांडलेले आहेत.याचं पठडीतील नव्या दमाचे लेखक विशाल मोहोड यांनी ''कीड'' या पहिल्या वहिल्या कादंबरीतून उत्तमरीत्या सामाजिक भान जोपासत बेरोजगारी सारख्या विषयावर दर्जेदार लेखन करून सुशिक्षित बेरोजगारांचे भीषण वास्तव समाजापुढे मांडले आहेत,आणि त्यामध्ये ते यशस्वी सुद्धा झाले आहेत.

आपल्या सातत्यपूर्ण दर्जेदार लेखन शैलीतून जीवनातील स्वानुभव टिपत जगण्यातील वास्तव परखड तथा खुमासदारपणे मांडणाऱ्या युवा लेखक विशाल भाऊराव मोहोड यांचा जन्म तसा अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल या इतिहास संपन्न गावातला.साहित्याशी कुठल्याही प्रकारचा संबंध नसलेल्या एका अतिसामान्य व गरीब कुटुंबातून असलेल्या विशालजी मोहोड यांचं बालपण अतिशय संघर्षमय राहिलेलं आहे.शिक्षण आणि पोटासाठीचा संघर्ष अशी दुहेरी कसरत करत त्यांनी अनेक अडथळ्यांवर मात करून आपलं ध्येय गाठलं.शेतमजुरी करता करता भाजीपाला विकून,पेपर वाटून आणि वेळप्रसंगी मिळेल ते काम करून विशालजी मोहोड यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं.मराठी आणि इतिहास या विषयांमध्ये एम.ए.करून पुढे संस्कृतमध्ये ॲडिशनल बी.ए.करून बी.एड पर्यंतचं शिक्षण त्यांनी स्वकष्टातूनचं पूर्ण केलं.बालवयातचं वडिलांचं छत्र हरवलेल्या विशालजींना त्या कठीण काळात त्यांचे जेष्ठ बंधू गजाननजी मोहोड यांचं खूप मोलाचं सहकार्य मिळालं.नोकरीसाठी त्यांचा संघर्ष सुरुचं होता.काही काळ खाजगी शिकवणी वर्ग देखील त्यांनी घेतले.प्रचंड अस्वस्थता आणि मनाची घालमेल या द्विधा मनस्थितीत कविताचं त्यांना जगण्याचा आधार वाटू लागली. येथुनचं खऱ्या अर्थाने त्यांची साहित्यिक वाटचाल सुरू झाली.पुढे कविता लेखनासोबतचं त्यांनी दै.देशोन्नतीच्या ''आत्मोन्नती'' पुरवणी मधून वंदनीय राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील विचारांवर आधारित आध्यात्मिक लेखन सुद्धा केले.अविरत संघर्ष आणि मेहनतीच्या बळावर अखेर त्यांना जलसंपदा खात्यात नोकरी मिळाली आणि भरकटलेल्या आयुष्याला स्थिरता प्राप्त झाली.

मात्र जे जगलं,भोगलं आणि अनुभवलं ते काही स्वस्थ बसू देत नव्हतं.आपले अनुभव काव्यातून अथवा साहित्यातून मांडत ते समाजापुढे यायला पाहिजे.ही प्रचंड तळमळ त्यांना अस्वस्थ करत होती.यातूनचं २०१७ मध्ये त्यांचा ''बाप'' हा पहिला कवितासंग्रह मेधा पब्लिकेशन अमरावती यांनी प्रकाशित केला.त्यानंतर त्यांनी कवितांसोबतचं कथालेखन सुरू केले आणि पाहता पाहता २०२१ मध्ये त्यांचा ''कुचंबणा'' हा बहुचर्चित कथासंग्रह नभ प्रकाशन अमरावती यांनी प्रकाशित केला.तब्बल आठ ते दहा राज्यस्तरीय नामांकित पुरस्कार या कथासंग्रहाला प्राप्त झाले.परंतु यशाने हुरळून न जाता त्यांनी आपले पाय मात्र जमिनीवरचं ठेवत शांत आणि संयमी चित्ताने लेखनातील सातत्य कायम ठेवत आत्ममग्न होऊन पुढील लेखनाचा प्रवास सुरुचं ठेवला. जीवनात आलेले अनेक कटू-गोड प्रसंग,दारिद्र्याची दाहकता,नोकरीसाठीचा संघर्ष,पदोपदी होणारी मानहानी,भ्रष्टाचाराने पोखरलेली समाजव्यवस्था हे सर्व विशालजींनी अनुभवलं आणि तेथूनचं खऱ्या अर्थाने ''कीड'' या कादंबरीचा जन्म झाला.बेरोजगारी हा विषय तसा जुनाचं,पण आजचा तरुण उच्च शिक्षण घेऊनही मनासारखे काम मिळू शकत नसल्यामुळे विवंचनेत आहे.वाढत्या गरजा, महागाईचा विळखा,रोजगारांचे कंत्राटीकरण,गलिच्छ राजकारण,भ्रष्टाचाराने बरबटलेली समाजव्यवस्था,लग्नाचे वाढते वय,त्यामुळे आलेले वैफल्य व निराशा या सर्व कारणांनी उद्ध्वस्त होणारी तरुणपिढी लेखक विशाल मोहोड यांनी अतिशय प्रभावीपणे ''कीड'' या कादंबरीतून रेखाटली आहे.एकूण १९२ पेजेसची ही कादंबरी मेधा पब्लिकेशन अमरावती,श्री संजयजी महल्ले यांनी प्रकाशित केली असून कादंबरीचे मुखपृष्ठ अतिशय सुंदर आणि सुबक आहे. सुप्रसिद्ध





**पुस्तक परीक्षण**
**विशाल कन्हेरकर.**
**निंभा. जि. अमरावती**
**मो. ९१७२२९८८३९**

रेखाचित्रकार श्री उद्धवजी शहाणे यांनी खुपचं सुंदर आणि बोलके चित्र उपलब्ध करून देऊन कादंबरीला जीवंतपणाचा साज चढवलेला आहे.ज्येष्ठ साहित्यिक श्री अरविंद उतखेडे यांची सर्वसमावेशक व नितांत सुंदर प्रस्तावना या कादंबरीला लाभली असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिका प्रतिमाताई इंगोले यांनी अतिशय सुंदर अशी पाठराखण केली आहे. तसेच ज्येष्ठ साहित्यिका शोभाताई रोकडे यांचा अत्यंत देखणा असा अभिप्राय कादंबरीची शान वाढवणारा आहे.

''कीड'' ही कादंबरी म्हणजे लेखकाच्या स्वानुभवाचं प्रकटीकरण आहे.कादंबरीचा नायक जरी दीपक असला तरी हा दीपक म्हणजेचं स्वतः लेखक आहे.तो सर्व सुशिक्षित बेरोजगार तरुणांचा मुख्य नायक आहे.अतिशय मोजके पात्र असूनही कादंबरी कुठेचं रटाळ वाटत नाही.उलट छोटे मोठे प्रसंग व दमदार संवाद यामुळे ते प्रसंग सुद्धा वाचतांना वाचकाला खिळवून ठेवतात. यातचं लेखकाचं फार मोठं यश सामावलेलं आहे.सुशिक्षित असूनही एकनिष्ठ,तत्वनिष्ठ व जन्मजातचं हुशार असलेला कादंबरीचा नायक दीपक आणि त्याचे समविचारी मित्र धर्मा कासदेकर,गौतम कांबळे,पिंटू डोंगरे,विष्णू देवधर,दुर्गेश पांडे, संचित आणि गौरव,या आठ-दहा मुख्य पात्रांभोवती फिरणारं हे कथानक वाचकांच्या मनाचा ठाव घेत पुढे सरकत राहते.ग्रामीण भागातील तुटपुंज्या शैक्षणिक सुविधेतून मार्ग काढत उच्च शिक्षित झालेला कादंबरीचा नायक दीपक नोकरीच्या शोधात प्रचंड धडपडतो.कितीतरी परीक्षा उत्तीर्ण होऊनही कधी पैशाभावी तर कधी आरक्षणामुळे नोकरी त्याला हुलकावनी देत राहते.अस्वस्थ होऊन जेव्हा तो परिस्थितीचा विचार करू लागतो तेव्हा त्याच्या समोर उभे राहते ते या देशातील भीषण वास्तव. बेरोजगारी, शेतकऱ्यांचे शोषण व त्यांच्या आत्महत्या, भ्रष्टाचाराने पोखरलेली न्यायव्यवस्था,प्रचंड महागाई जी कधीही न संपणारी आहे. इथल्या व्यवस्थेला लागलेली ही कीड खरचं खूप चिंतनीय असून लेखकाने कादंबरीतून प्रकर्षाने मांडली आहे.सकारात्मक विचार करणारा, सुसंस्कारी, ध्येयवेडा, कुटुंबवत्सल अशा अनेक गुणांनी परिपूर्ण असणारा कादंबरीचा नायक दीपक शेवटपर्यंत परिस्थितीशी झुंजत राहतो.शिकून सवरूनही भीतीपोटी त्याला बऱ्याच गोष्टींसाठी बळी पडावे लागते. आपल्या कर्मापासून परावृत्त होऊन तो शकून अपशकूनावर विश्वास ठेवतो शेवटी दगडातल्या देवालाही काहीतरी योग येऊ दे म्हणून साकडे घालतो तेव्हा, सर्व धर्मग्रंथ आणि त्यातील तत्वज्ञान त्याला फोल वाटू लागते.कधीकधी कमी शिकलेला आणि इमानदारीने आपला व्यवसाय करणारा व्यक्ती देखील जीवनाचं खूप मोठं तत्वज्ञान शिकवून जातो.हे भंगारवाल्याच्या एका छोट्याश्या प्रसंगातून लेखकाने अगदी चपखलपणे मांडले आहे.

**(क्रमशः)**



# संत रविदास : आधुनिकतेचा ध्यास

ज्योतिर्मय साहित्य

सामाजिक क्रांतीचे प्रणेते व संत शिरोमणी गुरू रविदास यांचा जन्म फेब्रुवारी महिन्यात माघ पौर्णिमेच्या दिवशी उत्तर प्रदेशातील वाराणसी जिल्ह्यात काशीजवळ गोवर्धनपूर (काहींच्या मते, मांडूर, माडुगडिह) येथे चांभार जातीत झाला. जन्माचा दिवस रविवार असल्याने त्यांचे नाव रविदास ठेवण्यात आले. (चौदाव्या शतकाचा कालखंड असल्याने, इसवी सन व तारखाबाबतीत स्पष्ट पुरावे नसल्याने, फेब्रुवारी १३७६, १३७७, १३९८ असा फरक अनेक ग्रथातून दिसून येतो. मृत्युच्या बाबतीतही स्पष्टता नाही. कॅलेंडरच्या तिथीनुसार दरवर्षी माघ पौर्णिमेलाच देशभर संत रविदास जयंती साजरी केली जाते.)

गुरू रविदास यांच्या वडिलांचे नाव रघुराम (रघुनंदन) व मातेचे नाव कर्मादेवी (कलसा, रघुराणी, घुरबिनिया) होते. त्यांच्या पत्नीचे नाव लोनाबाई तर, मुलाचे नाव विजयदास होते. मेलेल्या ढोरांच्या कातडीपासून पादत्राणे तयार करण्याचा कुटुंबाचा पारंपारिक व्यवसाय. कुटुंब अत्यंत गरीब असल्याने व पालणपोषणाची जबाबदारी रविदासांकडे लहानपणीच आल्याने त्यांना इतरही काबाडकष्टाची कामे करावी लागली. त्यांचे बहुतांश आयुष्य गंगा नदीच्या काठावर आध्यात्मिक अनुयायांमध्ये तसेच सूफी संत, साधू व तपस्वी यांच्या सहवासात गेले. त्यामुळे फावल्या वेळात त्यांना समाजजागृती करण्याचा ध्यास लागला. रविदासांचे वय १२ वर्षाचे असतानाच हळूहळू त्याचा कल शाश्वत चिंतनाकडे लागला.

त्याचवेळी हिंदू समाजात जातीवाद, वर्णवाद, अस्पृश्यता, पुरोहितवाद यांचे प्रस्थ माजले होते. जाती-जातीत, धर्मा-धर्मात व पंथा-पंथात कहर निर्माण झाला होता. जातिभेदामुळे शुद्र, अस्पृश्यजन अन्याय व अत्याचाराला बळी पडत होते. हे सर्व गुरू रविदास उघड्या डोळ्यांनी पाहत होते. त्यांचे मन द्रवले. म्हणून त्यानी ६००० जातीत विभागलेल्या समाजाला एकतेच्या सूत्रात बांधून भारतवर्षात स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा अहोरात्र प्रयत्न केला.

त्यांनी आपल्या अमृतवाणीने संपूर्ण भारत जागृत केला. त्यांच्या समाजप्रबोधनाने लक्षावधी लोक त्यांचे शिष्य बनले. राणी मीराबाई, राणी झाली, दिल्लीचा सुलतान सिकंदर शाह लोधी यांचासुद्धा त्यांच्या शिष्यगणात प्रामुख्याने समावेश होता. त्यामुळे त्यांच्या नावानेच रविदासी पंथाला सुरुवात झाली. रविदासी पंथाचे लोक जाती-उपजातीच्या नावाने ओळखले जाऊ लागले. जसे; रामदासिया, जटिया, कुरील, अहिरवार, महोबिया, कबीरपंथी, धुसिया, मोची, चौधरी, जैसवार, संखवार, चर्मकार, जाटव, चोपण इत्यादि.

जातिव्यवस्थेमुळे समाजाने उच्च-नीचतेच्या भिंती उभ्या झाल्या होत्या. त्या जमीनदोस्त करण्यासाठी संत रविदासांनी आपले आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या सामाजिक कार्याचा प्रचार व प्रसार संपूर्ण भारतभर दूरवर पोहचला. या सामाजिक क्रांतिकारकाची राज्याराज्यातील भाषेच्या उच्चारातील विविधतेमुळे वेगवेगळी नावे रुढ होत गेली. पंजाबी भाषेत रैदास, हिंदीत रविदास, राजस्थानमध्ये रोहिदास व राहीदास, बंगालमध्ये रुईदास, मराठीमध्ये रविदास, रैदास व रोहितदास; यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व नैतिक, बुद्धीवादी विचारांचा अखिल भारतीय स्तरांवर किती प्रभाव होता; हे दिसून येते.

आध्यात्मिक ज्ञानी व भक्तीकवी स्वामी रामानंद हे संत रविदासांचे गुरू होते; तर सेना महाराज, संत कबीर हे गुरुबंधु होते. त्यांचा गोतावळा मोठा होता. भारतीय धार्मिक परंपरेतील सतरा संतांपैकी एक म्हणून त्यांचा समावेश आहे. संत रविदासांच्या व्यक्तिमत्त्वाने व उदार विचाराने सामान्य जनता तर प्रभावित झालीच, परंतु संतश्रेष्ठीतील संत तुकाराम, गुरूनानक, गुरू कबीर, स्वामी सेवादास, संत एकनाथ, संत मीराबाई, संत दयाबाई, संत सेना अशा असंख्य संतांनी आपल्या पदात रविदासांच्या महानतेचे गुणगान केले आहे. गुरू कबीर म्हणतात;

प्रभाकर तांडेकर प्रदत्त
नागपूर
९४२१८०३४९८

साधुन में रविदास संत है, सुपच ऋषि को मानिया।
हिंदु-तूर्क दुई दीन है, कुछ नही पहछानिया।।

गुरू नानक तर आपल्या पदात सन्मानाने उल्लेख करतात;

रविदास ध्याये प्रभु अनुप।
गुरुदेव नानक गोविंद रूप।।

संत तुकाराम यांनी तर मुक्तकंठाने प्रशंसा करताना म्हटले आहे की;

निवृत्ती ज्ञानदेव सोपान चंगाजी, मेरे जी के है नाम देव।
नागाजन मित्र नरहरि सुनार, रविदास कबीर सगे मेरे।।

संत दयाबाई संत रविदासांच्या श्रेष्ठत्वाची महती सांगतात;

भेटो जब रविदास कूं लीनो भुजा प्रसार।
हरि लीला रीझै नही अचरज कहों अपार।।

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, ओशो रजनीश, भारताचे माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग, माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवनराम, राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त यांसारख्या अनेक महापुरूषांनी, विद्वानांनी, कवी व लेखकांनीसुद्धा संत रविदासांच्या कार्यकर्तृत्वाचा आपल्या लेखणीतून व वाणीतून उल्लेख केला आहे. तसेच संत रविदासांच्या जनजागृतीविषयी कृतज्ञता बाळगून त्यांच्या भक्तांनी देशातील उत्तर भारत, दक्षिण भारत व मध्य भारत या भागातील अनेक ठिकाणी रविदास कुंड, रविदास मंदिरे, रविदास स्मारके व रविदास समाधीस्थळे बांधल्याचे आजही दिसून येतात.

आजच्या काळातसुद्धा त्यांच्या विचारांची गरज लक्षात घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आंग्लविद्या विभूषित चतुरस्त्र विद्वानाने गुरू रविदासांना गुरुचा मान देऊन द अनटचेबल नावाचा ग्रंथ समर्पित केला होता.

गुरू रविदासांनी चमत्कार, अंधश्रद्धा व ढोंगी प्रवृत्तींवर प्रहार केलेत. मूर्तीपूजेचे खंडण तसेच बाह्य अवडंबावर घणाघाती वारही केले. त्यांनी जातीव्यवस्थेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेस व ब्राह्मणी ग्रंथांच्या प्रामाण्यवादास नकार दिला. परंतु सांप्रदायिक विचारधारा जपणा-या इतिहासकारांनी गुरू रविदासांच्या क्रांतिकारी विचारधारेला नष्ट करण्यासाठी अनेक चमत्कारिक गोष्टी लिहून ठेवल्या. त्या त्यांच्या विचारांच्या विरुद्ध आहेत; हे सुज्ञ जनतेने ओळखले पाहिजे.



हिंदू-मुसलमान मंदिर-मस्जिदसाठी भांडतात. एकमेकाचे रक्त सांडतात. यासंदर्भात संत रविदास असे म्हणतात की, राम-रहीम एकच आहेत. परमेश्वर सर्वव्यापी आहे. सर्वांचा धर्म हा मानवधर्म असला पाहिजे. संत हे कोणत्याही धर्माचे नसतात तर सर्व धर्मियांसाठी असतात. म्हणून हिंदू-मुसलमान बंधु-भगिनींनी एकमेकांशी मित्रत्वाने वागले पाहिजे. याविषयी ते लिहितात;

मुसलमान सों दोस्ती, हिंदुअन सों कर प्रीत।
रविदास जोती सभ राम की, सभ है अपने मीत।।

याप्रमाणे धर्मा-धर्मातील तेढ दूर करून माणसांना जोडण्याचे कार्य करायला सांगतात.

पारतंत्र्य हे मोठे पाप आहे. पराधीनतेला किंवा गुलामाला धर्म नसतो. गुलामांना सर्वच नीच समजतात व त्यांचा अनादर, अपमान करतात. पराधीनता व हीनता नष्ट करण्यासाठी समाजाने संघटित होऊन स्वाभिमान जपण्यासाठी व मूलभूत हक्कांसाठी संघर्ष केला पाहिजे. स्वाधीनतेचे पुजारी बनले पाहिजे. त्यासंबंधी,

पराधीन कौ दीन क्या पराधीन बेदीन।
रविदास दास प्राधीन कौ सबहि समझै दीन।।

असा राष्ट्रीय एकात्मतेचा विचार संत रविदासांनी मांडला.

**(क्रमशः)**

# डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा!

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरा करण्याचे त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोज डे पासून सुरू झालेला हा डेज चा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, प्रॉमिस डे, टेडी डे, चॉकलेट डे, हग डे, किस डे असे विविध प्रकारचे डे येतात. डेज चा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण येत असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेज च्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील हास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त असावा असे काही नाही.




श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांना भेटवस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डे ची गरज नसते. बरे हे डे पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात तर डेज चे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, सिस्टर्स डे, ब्रदर्स डे, डॉटर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेज ची झाली आहे. सोशल मीडियावर ॲक्टीव असणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडतो. वर्षभर कधी आई वडीलांप्रती आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप ॲक्टीव असतात. जन्मदात्या आई वडिलांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डे ची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेज ची गरज आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने विचारून पहावा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!


# कै. श्री. बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धेचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** - भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे आयोजित कै. श्री. बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२४- २०२५ या वर्षात निबंध स्पर्धेसाठी 'विकसित भारत- सन २०४७', उपेक्षितांसाठी सार्वजनिक धोरण आणि शासन सेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग विषयांवर निबंध सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निबंध हा वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर इंग्रजी किंवा मराठीतून सादर करावयाचा आहे. निबंध ३ हजार शब्दांपेक्षा कमी आणि ५ हजार शब्दांपेक्षा जास्त नसावा, निबंध हा विषयाच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक, संशोधनपर व पदव्युत्तर दर्जाचा असणे अपेक्षित आहे. निबंध कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करुन त्यावर केवळ टोपणनांव लिहून चार प्रतीत सादर करावा. स्पर्धकाने निबंधावर आपले नाव किंवा कोणत्याही प्रकारची ओळख नमूद करु नये, निबंधाच्या प्रती व त्या सोबत वेगळया लिफाफ्यात स्पर्धकाचे नाव (मराठी व इंग्रजीतून); टोपणनाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल, पत्ता नमूद करुन निबंधासोबत पाठवावे. या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस १० हजार रुपये, दुसरे बक्षिस ७ हजार ५०० रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये उत्तेजनार्थ बक्षिस २ हजार रुपये देण्यात येणार आहेत. संस्थेस प्राप्त झालेल्या निबंधाच्या प्रती परत करण्यात येणार नाहीत. निबंधाचे मूल्यमापन हे संस्थेच्या प्रादेशिक शाखेच्या परीक्षक मंडळाकडून करण्यात येईल. योग्य त्या गुणवत्तेचा निबंध नसल्यास स्पर्धकास बक्षीस न देण्याचा किंवा बक्षिसाची रक्कम कमी करण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे. बक्षीस देण्याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम राहील. संस्थेच्यावतीने यापूर्वी घेतलेल्या स्पर्धेत विजेता ठरलेला किंवा उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त स्पर्धक हा लगतची तीन वर्षे या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र ठरणार नाही.

ज्योतिर्मय साहित्य



**विद्यार्थ्यांशी हितगुज**

लक्ष्मण जगताप, बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

तुमच्या आयुष्याला वळण देणारा महत्वाचा टप्पा म्हणजे एच.एस.सी ( बारावी) परीक्षा होय.तुम्ही वर्षभर अभ्यासाची प्रचंड मेहनत घेतली आहे.मनावर कोणतेही दडपण ,ताण न घेता अत्यंत आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा.खालील गोष्टींकडे लक्ष द्या.

१.परीक्षेला जाताना आपले हॉल तिकिट, पेन तसेच इ.आवश्यक साहित्य घेऊन जा., २. दिलेल्या वेळेचा पूर्ण वापर करा., ३.प्रत्येक प्रश्न नीट समजून घ्या., ४.एकाग्रतेने पेपर लिहा., ५.लेखन करताना हस्ताक्षर, नीटनेटकेपणा याकडे लक्ष द्या., ६.पेपरमध्ये खाडाखोड टाळा., ७.झालेल्या पेपरचा विचार करु नका., ८.परीक्षेच्या काळात मन आनंदी व प्रसन्न ठेवा., ९.आपले आरोग्य तसेच आहाराकडे लक्ष द्या.

तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल अशी खात्री आहे. पालक म्हणून आम्ही नेहमीच तुमच्या पाठीशी आहोत.







हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559